# शेतकरी उत्पादक कंपनी विकासाचा दृष्टीकोन

**प्रा. प्रनिल काळे** **डॉ. राम जोंधळे**
सहाय्यक प्राध्यापक (कृषी अर्थशास्त्र विभाग)
छ. शा. म. शि. संस्था, कृषी महाविद्यालय, कांचनवाडी, औरंगाबाद

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा व आत्मा आहे. अनेक उदयोगांना कच्चा माल पुरविण्याचे काम कृषी क्षेत्र करीत असते. हरितक्रांतीनंतरही कृषी क्षेत्रासमोर विविध आव्हाने उभी आहेत. चांगल्या प्रतीचे बी-बियाणे न मिळणे खत, आणि इतर शेतीला आवश्यक असलेल्या निविष्ठांचा अपुरा पुरवठा, तयार मालाला बाजारभाव व विक्री अशा अनेक अडचणी आहेत या अडचणीतुन मार्ग काढण्यासाठी एक उत्तम पर्याय म्हणजे शेतकऱ्यांनी संघटित होऊन शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना करणे. कंपनी कायदा १९५६ कलम ५८१ ऐ ते ५८१ झेड टी नुसार शेतकरी उत्पादक कंपनीची संकल्पना आली आहे.




### शेतकरी उत्पादक कंपनी स्थापनेची उद्दीष्ट:

शेतकरी उत्पादक कंपनीच्या संकल्पनेमध्ये विविध प्रकारचे शेतकरी उत्पादक, लहान आणि किरकोळ शेतकऱ्यांचे गट, समुह एकत्रीत आणले जातात परिणामी अनेक आव्हाने एकत्रितपणे सोडवले जाऊ शकतात तसेच सदर शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत एक प्रभावी संघटन तयार करणे जसे की गुतवंणुक करणे, नवीन तत्रंज्ञान अद्यावत करणे, नवीन बाजारपेठा निर्माण करणे तसेच तयार असलेल्या बाजारपेठेत सुधारित प्रवेश करणे, विविध शेती पिकांचे उत्पादन घेणे तसेच उत्पादित मालावर प्रकिया करुन विविध प्रकारचे बायप्रोडक्ट बनविणे कंपनी मार्फत खरेदी-विक्री केंद्र उभारणे मालाची प्रतवारी करुन श्रेणी ठरवणे मालाची बाजारपेठेत मार्केटिंग करणे, कंपनीच्या सदस्यानी उत्पादीत केलेला माल कंपनीच्या नावाने ब्रॅडींग करणे, कंपनी सदस्याचे प्राथमिक उत्पादन निर्यात करणे किंवा आवश्यक वस्तू व सेवा आयात करणे.

### शेतकरी उत्पादक कंपनीचे फायदे:

- शेतकरी उत्पादक कंपनीमुळे शेतकऱ्यांना कृषिमालांच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या निविष्ठांची एकत्रित खरेदी करता येते.
- तसेच यंत्राचा वापर काढणी प्रकिया, साठवणुक, पॅकिंग, ब्रॅडिंग व विपणन व्यवस्थेचा एकत्रित स्वरुपात लाभ घेता येतो.
- शेतकरी उत्पादक कंपन्या या सरकारी अर्थसंकल्प व योजनेच्या प्रवाहात सामील होतात त्यामुळे नवीन आर्थिक धोरणानुसार थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून सरकारला शेतकऱ्यांचे कर्ज आणि सबसिडी यांचा समतोल राखण्यास मदत मिळते.
- शेतकरी उत्पादक कंपनीमुळे एकीचे बळ मिळाल्याने शेतकऱ्यांना विविध अडचणीवर एकत्रित होऊन मात करता येते तसेच कमी खर्चात जास्त उत्पादन घेता येते.
- शेतकरी उत्पादक कंपनीला निर्यात क्षेत्रात प्राधान्य असल्यांने योग्य उत्पादन क्षमता आणि गुणवत्ता असल्यास आपले उत्पादन विदेशी खरेदीदारांची पसंती ठरु शकते.

### शेतकरी उत्पादक कंपनीसाठीच्या विविध योजना:

- नाबार्ड कडुन सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध होते तसेच विविध प्रकल्पांना अनुदान मिळते आणि नाबार्डच्या प्रोडयुस ऑर्गनायजेशन डेव्हलपमेंट फंड तर्फे विविध प्रकारचे कर्ज उपलब्ध करुन दिले जाते.
- शेतकरी उत्पादक कंपनीची नोंद झाल्यापासुन पुढील ५ वर्षे नफयावर कोणताही कर भरावा लागत नाही.
- कर्जावरील व्याजदर हा इतर कंपन्यापेक्षा कमी असतो.
- सहकारी संस्थाना मिळणाऱ्या विविध योजनांचा लाभ आता शेतकरी उत्पादक कंपन्याना देखील मिळतो.
- इक्विटी ग्रॅन्ट योजना - SAFC Delhi या संस्थेकडून शेतकरी उत्पादक कंपन्याना १५ लाख रुपयापर्यंत इक्विटी ग्रॅन्ट दिले जाते.
- क्रेडिट ग्यांरटी फंड SAFC, Delhi या संस्थेकडून उत्पादक कंपन्याना त्यांच्या प्रोजेक्टच्या ८५ % किंवा जास्तीत जास्त १ कोटी रुपयापर्यंत कमी व्याज दराने कर्ज मिळते.
- अवजारे बॅंका – महाराष्ट्र राज्यात अनेक अवजारे बॅंक सुरु झालेल्या असून त्यातुन शेतकऱ्यांना व उत्पादक कंपन्याना विविध प्रकारची अवजारे आणि यंत्र सामग्री भाडे तत्वांवर सुलभ हप्त्याने प्राप्त होते.

• स्मार्ट प्रकल्प – जागतिक बँक आणि राज्य सरकार यांच्या संयुक्त माध्यमातुन राज्यातील १० हजार गावामध्ये स्टेट बँक ऑफ महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस ॲण्ड रुरल ट्रान्सफॉर्मेशन (स्मार्ट) ही योजना सुरु करण्यात येणार आहे या योजनेअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांना विविध प्रक्रिया उदयोग दिले जाणार आहेत.

• बिनव्याजी बिनतारण प्रकल्प कर्ज – शेतकरी उत्पादक कंपन्याना आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातर्फे १० लाख रुपये बिनातारण बिनव्याजी प्रकल्प कर्ज दिले जाते.

### शेतकरी उत्पादक कंपनीचे व्यवस्थापन:

• उत्पादक कंपनी स्थापन करण्याकरिता कमीत कमी ५ व जास्तीत जास्त १५ संचालकाची नोंदणी करता येते.

• किमान ५ संचालक आणि ५ प्रवर्तक एकत्र येऊन १० व्यक्ति कंपनीची नोंदणी करु शकतात. प्रवर्तक व संचालक एकच असु शकतो.

• संचालक मंडळाने कामकाजाकरिता पूर्ण वेळ आपल्या पेक्षा वेगळा व्यवस्थापक नियुक्त करावा.

• व्यवस्थापनाचे अधिकार संचालक व्यवस्थापकांना देऊ शकतात.

### शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी करण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे:

• प्रत्येक संचालक आणि सभासदाचे स्वत:प्रमाणित केलेले पॅनकार्ड आणि आधारकार्ड (दोन्हीपण)

• प्रत्येक संचालक आणि सभासदाचे स्वत: प्रमाणित केलेले बँक स्टेटमेंट (पहिले आणि शेवटचे पान) किंवा स्वत: च्या नावावर असलेले चालू वीज बील (रहिवासी पुरव्याकरिता)

• प्रत्येक संचालक व सभासदाचा शेतकरी असल्याचा पुराव्यासाठी तलाठयाच्या सही शिक्क्यासह ७/१२ उतारा आणि तहसिलदाराच्या सही/ शिक्क्यासह शेतकरी असल्याचा दाखला (दोन्हीपण)

• ७/१२ उतारा सभासदाच्या स्वत: च्या नावावर नसेल तर नातेवाईकाचा ७/१२ उतारा आणि तलाठयाच्या सही शिक्क्यासह शेतकरी प्रमाणपत्र आणि तहसीलदाराच्या सही/शिक्कासह शेतकरी असल्यांचा दाखला (दोन्हीपण)

• सर्व संचालक आणि सभासदाचे शेतकरी असल्याचे तालुका कृषी अधिकाऱ्यांचा सही शिक्क्यासह सर्वाचे मिळून एकत्रित प्रमाणपत्र

• प्रत्येक संचालक आणि सभासदाचे रंगीत पासपोर्ट फोटो

• प्रस्तावित कंपनीसाठी योग्य नावे (कमीतकमी ६)

• कंपनीच्या प्रस्तावित कार्यालयाचे वीज बिल आणि ऑफिस मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र

• प्रत्येक संचालक आणि सभासदाचा मोबईल नंबर, ई-मेल आयडी, शैक्षणिक पात्रता, जन्माचे ठिकाण आणि शेअर्स रक्कम इ. माहीती तकत्यात भरुन सादर करावी.

• कंपनीचा प्रस्तावित व्यवसाय.

### शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी प्रक्रिया:

• **संचालक ओळख क्रमांक** (DIN) Director Identification Number- उत्पादक कंपनी ५ संचालक आणि ५ प्रवर्तक नेमुन नोंदविता येते. प्रत्येक संचालकाकडे संचालक ओळख क्रमांक (DIN) भारतीय वाणिज्य मंत्रालय यांचेकडे ई- अर्जकरुन काढावा लागतो.

• **डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र** – संचालकांची डिजिटल स्वाक्षरी लागते यासाठी एम सी ए (Ministry of consumers Affairs) च्या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरावा लागतो.

• **कंपनीच्या नावाकरीता अर्ज** – कंपनीच्या नावाकरीता ई-फॉर्म १ अ मध्ये अर्ज सादर करावा लागतो किमान सहा नावे सुचवावी लागतात. हि नावे इतर ट्रेड मार्क किंवा कंपनीच्या नावाची मिळती जुळती नसावी.

• **कंपनीची नोंदणी** – एकदा आर ओ सी (REGISTRAR OF COMPANY) कडून नाव मंजुर झाले कि ते नाव 60 दिवसांपर्यत राखीव असते. त्यामुळे 60 दिवसात कंपनीची नोंदणी करण्याकरिता आवश्यक त्या बाबी पुर्ण करणे गरजेचे असते. यामध्ये मेमोरँडम ऑफ असोसिएशन आणि आर्टिकल ऑफ असोसिएशनचा आराखडा तयार करावा लागतो एमओए आणि ए ओ ए चा आराखडा संचालकांनी इंग्लिश भाषेत स्वाक्षरीत करुन घ्यावा, स्वाक्षरी मराठीत असल्यास प्रतिज्ञापत्र द्यावे लागते.

• **संस्था नोंदणी करिता अर्ज सादर करणे:**

• फॉर्म १ : आर.ओ.सी. कडे अर्ज आणि कंपनी इन्कॉर्पोरेशन डिक्लेरेशन श एम.ओ.ए. आणि ए.ओ.ए. फाईल करावा लागतो.

• फॉर्म १८ : कंपनीच्या पत्याची नोटीस.

• फॉर्म ३२ : संचालकांच्या नियुक्त आणि त्याचे सहमती पत्र जे त्यांनी स्वाक्षरी केलेले आहे.

• हे सर्व अर्ज फॉर्म आर.ओ.सि. कडे ई अर्जाद्वारा सादर करावे लागतात.

• **नोंदणी प्रमाणपत्र** – जर सादर केलेल्या कागदपत्रातबाबत रजिस्ट्रार ऑफ कंपनी (ROC) चे समाधान झाले तर कंपनी नोंदणीचे प्रमाणपत्र जारी करतात. अन्यथा समाधान होईपर्यत वेगवेगळे आवश्यक कागदपत्र/ पुरावे सादर करावयाच्या सुचना देतात.

• **संचालकाची बैठक** - कंपनी नोंदणी झाल्यानंतर 30 दिवसाच्या आत संचालक मंडळाची बैठक आयोजीत करावी. या बैठकीचे विषय स्थानिक भाषेत तयार करावे किंवा इंग्लिश मध्ये ही चालेल त्यावर व्यवस्थापनाने स्वाक्षरी करावी व सात दिवस आधी संचालकाना पाठविण्यात यावा.

(संपर्क: +९१ ८९२८८४४१८१)

★ ★ ★